पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / ११८२ / २०१२
दिनांक - १४ / ०९ / २०१२

प्रति,

मा.............................................
**सदस्य, शहर सुधारणा समिती,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक २० / ०९ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २० / ०९ / २०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंप्री चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\agenda१०doc.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १०**

दिनांक :- २० / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २० / ०९ / २०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक १६/०८/२०१२, ०५/०९/२०१२ व ०७/०९/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ८ ) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ०७/०९/२०१२ रोजी झालेल्या (विशेष) सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१ :- मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली, जि.पुणे येथील प्रस्तावित रस्त्यांखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भुसंपादन अधिनियम १९८४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे. **( दिनांक २०/०९/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२ :- प्रभाग क्र.४० मध्ये तुळजाई मंदिराजवळ जूने शौचालय पाडून शौचालय इमारत बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणेच्या कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४६,०१,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ :- मौजे पिंपळे सौदागर, ता.हवेली, जि.पुणे येथील (रस्ता रुंदी १८.०० मी., रस्त्याचे नांव - पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डन हॉटेल जवळील आरक्षण क्र.३६१ अ उद्यान ते मिलीटरी हद्दीपर्यंत रस्ता, स.नं. - ६७, ३९, ४०, क्षेत्र - ९,००० चौ.मी.) रस्त्यांखालील जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंप्परी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ११८२ / २०१२
दिनांक :- १४ / ०९ / २०१२

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१\shsu-११-१२\agenda१०doc.